# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालय,

प्रशासकीय इमारत,१० वा मजला,शासकीय वसाहत,वांद्रे (पू.),मुंबई ४०० ०५१
दूरध्वनी :२६५५६७९९ फॅक्स : २६५५६८०५ E Mail- collectormsd@gmail.com


क्रमांक- सी/कार्या-७/कावि-mpcb/२१
दिनांक- ०८/०६/२०२१

प्रति,

उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई -४
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,उप प्रादेशिक कार्यालय, मुंबई-४
कल्पतरु पॉईंट, १ ला मजला,शीव माटुंगा स्कीम रोड नं. ८,
शीव सर्कल जवळ, शीव पूर्व,मुंबई-४०० ०२२

**विषय** : मौजे दहिसर तालुका बोरीवली येथील न.भू.क्र. ११८/सी या मिळकतीवरील मे. निकुंज रिलेटर्स डेव्हलपर्स अॅन्ड कॉन्ट्रॅक्टर या प्रकल्पाच्या पुर्नबांधकामाबाबत जनसुनावणी घेणेबाबत. . .

**संदर्भ** : आपलेकडील पत्र जा. क्रमांक: मप्रनि/उप्राकामु-४/५२७- FTS-०१८५. दि. ०८/०३/२०२१

विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून त्याचे अवलोकन करता उपरोक्त विषयान्वये मौजे दहिसर तालुका बोरीवली येथील न.भू.क्र. ११८/सी या मिळकतीवरील मे. निकुंज रिलेटर्स डेव्हलपर्स अॅन्ड कॉन्ट्रॅक्टर या प्रकल्पाच्या पुर्नबांधकामाबाबतचा प्रस्ताव आपल्या कार्यालयास प्राप्त झाला असून त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी ही पर्यावरण अधिनियम २००६ व सुधारित २००९ तसेच सागरतटीय विनियमन अधिनियम दि.०६/०१/२०११ नुसार पर्यावरणविषयक जनसुनावणी दिनांक ०४/१२/२०२० रोजी १२.०० वाजता रीवर व्हुव हॉल, बापु बागवे मार्ग, दहिसर पुलाजवळ, कावेरी बिल्डींगच्या बाजुला, कांदरपाडा, दहिसर (प.), मुंबई नं. ४०००६८ येथे आयोजित करण्यात आली होती.

सदर जनसुनावणीचे इतिवृत्त आपलेकडील संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयास मान्यतेस्तव प्राप्त झाले होत. सदर इतिवृत्त स्वाक्षरी करुन या पत्रासोबत उचित कार्यवाहीस्तव आपलेकडे पाठविण्यात येत आहे. तरी नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

निवासी उपजिल्हाधिकारी,
तथा अपर जिल्हा दंडाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा

प्रत : निकुंज रियलटर्स डेव्हलपर्स आणि कॉन्ट्रॅक्टर, १०४/१०५ सिद्धेश्वर अपार्टमेंट, एल टी नगर, पोईसर जिमखाना रोड, कांदिवली पश्चिम, मुंबई – ४०० ०६७

Scanned with CamScanner

# जनसुनावणीचे इतिवृत्त

मे. निकुंजा रियल्टर्स डेव्हलपर अॅन्ड कॉन्ट्रेक्टर, सी.टी.एस. नं. ११८/सी, गाव दहिसर (पश्चिम), तालुका बोरीवली, मुंबई- ४०० ०६८ येथे प्रस्तावित पुनर्बांधकामाबाबतची पर्यावरणविषयक जनसुनावणी ०४.१२.२०२० रोजी दुपारी १२.०० वाजता रीवर व्हुव हॉल, बापु बागवे मार्ग, दहिसर पुलाजवळ, कावेरी बिल्डींगच्याबाजुला, कांदरपाडा, दहिसर (प), मुंबई- ४०० ०६८ याठिकाणी आयोजित करण्यात आली होती. सदर जनसुनावणीसाठी खालील शासकीय अधिकारी उपस्थित होते.

१) डॉ. विकास नाईक - अध्यक्ष
निवासी उपजिल्हाधिकारी/
अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी
मुंबई उपनगर

२) डॉ.अनंत हर्षवर्धन - सदस्य्
प्रादेशिक अधिकारी,मुंबई
म.प्र.नि. मंडळ, मुंबई.

3) श्री. देविदास कोपरकर - आयोजक
उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई -४
म.प्र.नि. मंडळ. मुंबई.

जनसुनावणीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे —

सर्वप्रथम श्री. देविदास कोपरकर , जनसुनावणीचे आयोजक यांनी सर्वांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने जनसुनावणीस सुरुवात केली. त्यांनी आजची जनसुनावणी ही भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, दिल्ली यांच्या अधिनियम २००६ व सुधारीत २००९ तसेच जनसुनावणी सागरी तटीय विनियमन अधिनियम २०११ चे कलम क्र. ८ (V) (C) (d)- ४ शुध्दीपत्रक ६ जानेवारी २०११ मधील तरतुदी नुसार घेण्यात येत आहे असे सांगितले. सदर प्रकल्प धारकाने म.प्र.नि. मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीसाठीचा दि. १८.०१.२०१९ रोजी प्रस्ताव सादर केला. तद्नंतर मा. अतिरीक्त जिल्हा दंडाधिकारी यांनी शुक्रवार, दिनांक ०४.१२.२०२० रोजी पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्याची तारीख निश्चित केली. सदर जाहीर जनसुनावणीची जाहिरात एक महिना अगोदर दैनिक नवशक्ती या वर्तमानपत्रात मराठी भाषेमध्ये तसेच दैनिक फ्री प्रेस जर्नल या वर्तमानपत्रात इंग्रजी भाषेमध्ये दिनांक ०२.११.२०२० रोजी प्रसिध्दी करण्यात आली. त्याअनुषंगाने आजची पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजीत करण्यात आलेली आहे. सदर प्रस्तावीत प्रकल्पाच्या प्रवर्तकांनी तयार केलेल्या पर्यावरण विषयक अहवालाच्या प्रती जिल्हाधिकारी कार्यालय, मा.जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे, जिल्हाधिकारी कार्यालय, प्रशासकिय इमारत १० वा मजला, शासकिय वसाहत, बांद्रा (पुर्व), मुंबई -५१. मा. प्रधान सचिव ,पर्यावरण विभाग मंत्रालय, नवीन प्रशासकिय इमारत, मुंबई. प्रादेशिक अधिकारी

Scanned with CamScanner

(मुख्यालय), मप्रनि मंडळ, सायन, मुंबई. सहाय्यक आयुक्त, आर/नॉर्थ वॉर्ड दहिसर, महानगरपालिका कार्यालय पै नगर,बोरिवली पश्चिम, मुंबई-९१., प्रादेशिक अधिकारी/उपप्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई. इ. ठिकाणी रहिवासी यांना अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. या जनसुनावणीचा उद्देश रहिवासी यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी माहिती देणे, प्रकल्पामुळे पर्यावरणावर काय परिणाम होईल व त्यावर करावयाच्या उपाययोजना यांची माहिती देणे हा आहे असे सांगितले. श्री. देविदास कोपरकर. यांनी सांगितले की, प्रथम प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी प्रकल्पाविषयीची माहिती सादर करतील व त्यानंतर रहिवासी यांनी त्यांचे सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबत आक्षेप, तक्रारी, सुचना मांडाव्यात व त्याची नोंद इतिवृत्तात घेउन ते पुढे महाराष्ट्र सागर तटीय व्यवस्थापन प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई यांना पाठविले जाईल. तसेच या समितीचे काम जनसुनावणी घेणे, रहिवासी टिका, टिप्पणी यांची नोंद घेवून त्याचा अहवाल शासनाला सादर करणे हे आहे असे सांगितले व प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषी माहिती देण्याची सूचना केली.

यानंतर श्री. विवेक सिंह, प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी सदर प्रकल्पाबाबत विस्तृतपणे स्लाईड शो द्वारे सादरीकरण केले, सदर सादरीकरणामध्ये त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहिती, ठिकाण इ. बाबतची माहिती दाखविली. त्यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबतच्या इमारतीचा नकाशा, वाहन स्थळ तसेच रहिवाशी क्षेत्र इत्यादींची माहिती सादर केली. सदर प्रकल्पाचे सध्याचे क्षेत्रफळ २११०.३० चौ.मी. इतके असून ते सागर तटीय निर्वधन क्षेत्र २ मध्ये येते. सदर प्रकल्पाच्या ठिकाणी सेस इमारत असून सदर प्रस्तावित बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ हे ५२६३.५८ चौ.मी. इतके असेल सदर प्रकल्पामध्ये तळमजला ते २१ वरील मजले अशी ही रहिवास इमारत असेल. प्रकल्प पुर्ण होउन रहिवासी राहण्यास आल्यानतर पाण्याचा वापर हा ५० घ.मी. प्रती दिन इतका असेल. तर त्यातून निर्माण होणारे सांडपाणी हे ४० घ.मी. प्रती दिन इतके असेल. सदर प्रकल्पातून निर्माण होणारे घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया संयत्रणा उभारली जाणार आहे. प्रक्रिया केलेले सांडपाणी हे फ्लशिंग आणि बगिच्यासाठी वापरण्यात येईल व उर्वरीत प्रक्रिया केलेले सांडपाणी बृहन्मुंबई म०नगरपालिकेच्या मलनिसारण वाहिनीत विल्हेवाट केले जाईल. सदर प्रकल्पामधून निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे वर्गीकरण सुका व ओला असे करण्यात येईल व ओल्या कचऱ्याचे (OWC) खत बनविण्यात येईल व ते बाग बगिच्यासाठी वापरण्यात येईल. तर सुका कचरा हा पुनर्वापरासाठी पाठविण्यात येईल अथवा विकला जाईल. सदर प्रकल्प उभारत असताना आवाजाची तिव्रता कमी करण्याच्या दृष्टीने योग्य ती उपाययोजना करण्यात येईल. तसेच अग्नीशमन यंत्रणा. उर्जेचा वापर व बचत विषयी माहिती दिली. सादरीकरणाच्या शेवटी तांत्रिक सल्लागाराने प्रकल्पाधारकाकडून राबविण्यात येणार असलेल्या पर्यावरण विषयक उपाययोजनांची माहिती देवून सादरीकरण समाप्त केले.

तदनंतर मा. अतिरीक्त जिल्हा दंडाधिकारी तथा अध्यक्ष यांनी उपस्थित रहिवासी यांना प्रकल्प प्रवर्तकाने पर्यावरण विषयक केलेल्या सादरीकरणाच्या अनुषंगाने काही शंका, टिका टिप्पणी अथवा उपाययोजना बद्दलची माहिती द्यावयाची असल्यास आपण ती या ठिकाणी तोंडी अथवा लेखी स्वरूपात सादर करणे बाबत सुचविले तसेच सदरची माहिती ही फक्त पर्यावरण विषयासंबंधीत असणे आवश्यक

Scanned with CamScanner

आहे. सदर प्रश्नांच्या अनुषंगाने प्रकल्प प्रवर्तक त्यावर करण्यात येणाऱ्या उपाययोजनांच्या अनुषंगाने थोडक्यात माहिती देतील असे नमूद केले.

प्रश्नोत्तरे

**श्री. डॉ.अनंत हर्षवर्धन, प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई**

प्रश्न:- एकुण प्रकल्पामध्ये मोकळी जागा व लावण्यात येणा-या वृक्षाविषयी माहिती देण्यास सांगितले ?.

उत्तर :- श्री. विवेक सिंह, सल्लागार यांनी कंपाऊंड वॉलच्या बाजुने वृक्षलागवड करण्यात येईल असे सांगितले.

**श्री. नरेंद्र झवेरी, रहिवाशी**

प्रश्न:- प्रकल्पग्रस्त रहिवाशांना एकुण किती क्षेत्रफळाचे सदनिका (घर) दिले जाईल ?

उत्तर :- श्री. गौरव सोळंकी, प्रकल्प विकासक यांनी प्रकल्पग्रस्त रहिवाशांना एकुण ४५० चौ.फुट चटईक्षेत्र दिले जाईल असे सांगितले.

**श्री. अजय रमणीकलाल दोडिया रहिवाशी**

प्रश्न :- या नियोजित प्रकल्प पूर्ण करण्यासाठी किती अवधी लागेल ?

उत्तर:-:- श्री. गौरव सोळंकी, प्रकल्प विकासक यांनी नियोजित प्रकल्पासाठी सर्व शासकीय परवानगीनंतर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी छत्तीस महिने आवश्यक आहेत.

**श्री. किशोर तिवारी, समाजसेवक**

प्रश्न :-प्रकल्पधारकांनी मोडकळीस आलेली इमारत पाडण्यापुर्वी मुंबई महानगरपालिकेची न हरकत प्रमाणपत्र घेतले का ? व डेब्रीजची विल्हेवाट कुठे लावण्यात येईल याविषयी माहिती विचारली ?.

उत्तर:-:-श्री. विवेक सिंह , सल्लागार यांनी यासाठी महानगरपालिकेची ना हरकत प्रमाणपत्र घेतली असून व डेब्रीजची विल्हेवाट महानगरपालिकेने निच्छित केलेल्या ठिकाणी करण्यात आली आहे असे सांगितले.

**श्री. किशोर तिवारी, समाजसेवक**

प्रश्न :-रहिवाशी इमारती मधुन निघणा-या घरगुती सांडपाण्याची विल्हेवाट कोणत्याप्रकारे लावणार आहात ?.

उत्तर:-:- श्री. विवेक सिंह , सल्लागार यांनी सांगीतले की, घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सयंत्रणा बसविण्यात येईल.

शेवटी जन सुनावणी समितीचे अध्यक्ष मा. अतिरीक्त जिल्हा दंडाधिकारी यांनी उपस्थितांनी जे म्हणणे आज मांडलेले आहे त्याची नोंद घेण्यात आलेली आहे, आजच्या जनसुनावणीचे इतिवृत्त, सी.डी. व आपण विचारलेल्या प्रश्न याचा समावेश करून पुढे महाराष्ट्र सागर तटीय व्यवस्थापन प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई यांना पाठविले जाईल असे सांगितले.

Scanned with CamScanner

तदनंतर सदर प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीसाठी सर्वांनी उपस्थित राहून आपली मते मांडून जनसुनावणी शांततेने पार पाडल्याबद्दल उपस्थितांचे आभार मानले तसेच प्रकल्पातील रहिवाशी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांचे या प्रकल्पाविषयी पर्यावरण विषयी प्रश्न नसतील असे सांगितले व त्यांनी जनसुनावणी यशस्वी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| देविदास कोपरकर<br>उप प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, मुंबई,<br>आयोजक /सदस्य<br>जनसुनावणी समिती | डॉ. अनंत हर्षवर्धन<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, मुंबई<br>सदस्य<br>जनसुनावणी समिती | डॉ. विकास नाईक<br>निवासी उपजिल्हाधिकारी तथा<br>अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी<br>मुंबई उपनगर<br>अध्यक्ष<br>जनसुनावणी समिती |

Scanned with CamScanner